नोंदीत बांधकाम कामगारांसाठी प्रायोगिक तत्वावर सुरूवातीस विभागीय स्तरावर भाडेतत्वावर घरकूल योजना राबविण्यात यावी. असे निर्देश दिले आहेत.

त्यासाठी संबंधित महानगरपालिका. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. सिडको इ. यांचेकडून जागा उपलब्ध करुन घ्यावी व शासनाच्या सहमतीने घरकूल योजना प्रायोगिक तत्वावर राबविण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला आहे.

त्यानुसार दि. ११.०८.२०१६ व दि. ११.११.२०१६ रोजी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यासअनुसरून शासनाचे पत्र दि. २०.०२.२०१७ अन्वये मंडळातील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांकरीता भाडयाच्या घरांचा संचय निर्माण करण्याच्या योजनेस शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

त्यानुसार सदर योजना राबविण्यासाठी उक्त उपसमितीमार्फत योजनेचा आराखडा बनविणे आवश्यक आहे. त्यामध्ये योजनेचे निकष जसे की. जागा विकत घेऊन त्यावर घरे बांधून घ्यावेत अथवा विकासंकाडून तयार घरे विकत घ्यावीत, अथवा तयार घरे भाडे तत्वावर घ्यावीत याबाबतची व्यवहार्यता तपासणे. कामाच्या ठिकाणापांसून घरांचे अंतर. भाडयाचे निकष म्हणजेच घराच्या क्षेत्रफळाच्या प्रमाणात

भाडयाची शहर निहाय/स्थळनिहाय दरनिश्चीती. पात्र बांधकाम कामगारांकडून करण्यात येणारी भाडयांच्या घरांची मागणी. मागणीच्या प्रमाणात घरांची उपलब्धता/पुरवठा याबाबत नियतकालिक तपासणी करणे. घर वितरणाचे निकष. घरांची दुरस्ती व देखभाल. विद्युत/पाणी पुरवठा तसेच मालमत्ता कर भरणे इ. सर्व बाबींचा अंतर्भाव करून योजनेचा सर्व समावेशक आराखडा उपसमितीमार्फत तयार करून घेऊन मंडळाच्या मान्यतेनंतर शासनास सादर करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

दि.०३.०९.२०१६ रोजी झालेल्या मंडळाच्या बैठकीत सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी समिती गठीत करावी व सदर समितीमध्ये काम करण्यासाठी एक सल्लागार व एक आर्किटेक्ट यांची नियुक्ती करण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आलेला आहे. तसेच सदर योजना राबविण्याबाबत मंडळाचे मालक प्रतिनिधी श्री. सतीश मगर यांची मदत घेण्यात यावी असेही सर्वानुमते ठरले आहे.

सदर ठरावाच्या अनुषंगाने मुख्य वास्तूविशारद व नियोजन प्राधिकारी म्हाडा यांना त्यांच्या पॅनलवर असलेल्या एका आर्किटेक्टची सदर समितीमध्ये कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्याकरीता त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या आर्किटेक्टची यादी

पाठविण्याबाबत पत्र व्यवहार करण्यात आलेला होता. त्यानुसार मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, म्हाडा यांनी समंत्रक वास्तुशास्त्रज्ञांची यादी पाठविलेली आहे. सदर यादीच्या अनुषंगाने सर्वात कमी दराची (रु. १००००/- प्रति महिना मानधन) निविदा सादर करणाऱ्या मे. शेटये आर्किटेक्ट यांची नियुक्ती करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. असे मंडळ सचिव यांनी सांगितले.

यावर मा. मंत्री महोदय यांनी शासकिय प्राधिकरणांकडून भाडे तत्वावर घरे उपलब्ध करुन घेऊन ती मंडळाच्या नोंदित बांधकाम कामगरांना भाडे तत्वावर देण्यात यावी असे सुचविले.

मालक प्रतिनिधी श्री मगर यांनी सदर प्राधिकरणांकडून Lease वर घरे घेण्यात यावी असे सुचविले. मालक प्रतिनिधी श्रीमती वेदा आगटे यांनी बिडी तयार करणाऱ्या कामगारांना ज्या पध्दतीने घरकूल योजना राबविण्यात आली त्या पध्दतीने बांधकाम कामगारांसाठी योजना राबविण्यात यावी असे मत व्यक्त केले.

त्यावर मा. मंत्री महोदय यांनी बांधकाम कामगारांना घरे उपलब्ध करुन देणे मा. मुख्यमंत्री यांचा मानस आहे, असे स्पष्ट केले. सदर योजनेबाबत अधिवेशनाच्या काळात

| | | |
|---|---|---|
| | | मा. मुख्यमंत्री यांच्या सोबत बैठक आयोजित करण्याचे मा. मंत्री महोदय यांनी सुतोवाच केले. तोपर्यंत सर्व शासकिय प्राधिकरणांकडून उपलब्ध घरांचा अहवाल प्राप्त करुन घ्यावा असेही निदेश मा. मंत्री महोदयांनी दिले.<br><br>याबाबत बोलताना मा. कामगार आयुक्त यांनी मालक प्रतिनिधी श्री मगर यांचा बांधकाम क्षेत्रातील अनुभव पाहता सदर योजना राबविण्यासाठी शासनाने सुचीत केलेल्या विविध मुद्यांवर सर्व समावेशक आराखडा तयार करुन त्यांनी मंडळास द्यावा. असे सुचविले. त्यास श्री मगर यांनी सहमती दर्शविली.<br><br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br><br>**ठराव: मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांसाठी भाडे तत्वावर घरे पुरविण्याच्या योजना राबविण्यासाठी शासनाने पत्राव्दारे सुचीत केलेल्या मुद्यावर सर्वसमावेशक आराखडा मालक प्रतिनिधी श्री. मगर यांच्याकडून प्राप्त करून घेणेबाबतचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| १४. | **मंडळाचे आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या अर्थसंकल्पिय** | सदर विषयाबाबत मडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की. मंडळाचे आर्थिक |

| | | |
|---|---|---|
| | **अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबत.** | वर्ष २०१७-१८ च्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे. त्याचे अवलोकन होऊन त्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. मंडळाचे आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकाचे सविस्तर वाचन केले व सदर अहवाल मंडळाची मान्यता घेऊन शासनास सादर करावयाचा असल्याचे सांगितले.<br><br>त्यावर उपसचिव श्रीमती सिंगल यांनी कायद्यातील कलम २४(३) नुसार प्रशासकीय खर्च मंडळाच्या एकुण खर्चाच्या ५% पेक्षा जास्त नसावा अशी तरतूद आहे असे स्पष्ट केले. तथापि, सदर अंदाजपत्रकामध्ये नमुद प्रशासकीय खर्च एकूण खर्चाच्या ५% पेक्षा जास्त असल्याचे त्यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले.<br><br>त्यावर मा. कामगार आयुक्त यांनी मंडळाच्या स्थापनेपासून आजपर्यंत मंडळाकडे पुरेसे प्रशिक्षीत मनुष्यबळ, कार्यालये, वाहने, माहिती तंत्रज्ञान विषयक सोयीसुविधा इत्यादी पायाभूत सुविधा उपलब्ध नाहीत. त्या उपलब्ध केल्याशिवाय मंडळाचे कामकाज परिणामकारक होणार नाही. या पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करण्यासाठी ५ % खर्चाची मर्यादा तंतोतंत पालन करणे खूप कठीण आहे. तसेच इतर |

| | | |
|---|---|---|
| | | अनेक राज्यामध्ये देखील पायाभूत सोयींसुविधा उपलब्ध करुन देतांना ५ % खर्चाची मर्यादा तंतोतंत पालन केले जात नाही. त्याचप्रमाणे याबाबत केंद्रशासन स्तरावर होणाऱ्या बैठकांमध्ये सदर अट शिथिल करण्याचा मुद्दा वारंवार उपस्थित करण्यात आलेला आहे. तथापि. केंद्र शासनाने अद्याप या मुद्यावर खुलासा केलेला नाही. असे नमूद केले. त्यावर मा. मंत्री महोदय व मा. अध्यक्ष यांनी मंडळाकडील उपलब्ध कर्मचारी व मंडळाच्या कामकाजाचा व्याप पाहता आवश्यक त्या ५% पेक्षा जास्तीच्या खर्चास वेळोवेळी शासन मान्यता देण्यात येईल. असे स्पष्ट केले.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मंडळाचे आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबतचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. सदर मान्य अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात यावे असेही सर्वानुमते ठरले.** |
| १५. | **कामगार नोंदणीच्या नुतणीकरणाचा कालावधी वाढविण्याबाबत.** | सदर विषयाबाबत मडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, दि.२४.१०.२०१६ रोजीच्या मंडळाच्या बैठकीच्या ठरावानूसार बांधकाम कामगारांची नोंदणी / नुतनीकरण ३ |

वर्षासाठी करण्याबाबत शासनमान्यता प्राप्त करुन घेण्यासाठी राज्यशासनास पत्रव्यवहार करण्यात आला असल्याचे सर्व उपस्थितांचे निदर्शनास आणून दिले. त्यावर सदर ठरावाची कायदेशीर वैधता तपासून तसेच त्याचे नोंदणीकृत बांधकाम कामगारांवर कोणते सामाजिक-आर्थिक परीणाम होतील याचा तपशिल देण्याबाबत बॅक क्वेरी करून शासनामार्फत मंडळास पत्र पाठविण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

याबाबत बोलताना मा. कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, केंद्र शासनाने आयोजित केलेल्या दि. २०.१२.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या तरतुदीनुसार कामगार नोंदणीचा व नुतणीकरणाचा कालावधी १ वर्ष असल्याने त्यामध्ये सुधारणा करता येणे शक्य नाही असे तोंडी अभिप्राय दिले आहेत. याबाबत केंद्र शासनास पत्र देऊन पुढील कार्यवाहीच्या सुचना प्राप्त करून घेण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे असेही ते म्हणाले.

यावर मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी कामगारांना लाभ मिळत नाहीत त्यामुळे कामगार नोंदणी होत नाही असे मत व्यक्त केले. त्यावर मा. कामगार आयुक्त यांनी

शासनाच्या दिनांक २४.१०.२०१३ रोजी मंडळास पाठविलेल्या शासन परिपत्रकाचा उल्लेख केला सदर परिपत्रकानुसार मंडळास शासन जे आदेश देईल त्याची अंमलबजावणी करणे मंडळास बंधनकारक आहे. त्यामुळे प्रत्येक ठरावाची अंमलबजावणी स्वतंत्रपणे मंडळस्तरावर करणे शक्य होत नाही. असे मा. कामगार आयुक्त यांनी नमूद केले.

सदर विषयाबाबत बोलताना मालक प्रतिनिधी श्रीमती वेदा आगटे यांनी नाका कामगारांना त्यांच्या कंत्राटदाराकडून पत्र दिले जात नाही. त्यामुळे त्यांच्याकडे जर ग्रामपंचातीचे पत्र असेल तर ते पत्र ग्राहय धरून संबंधित अधिकाऱ्यांनी नोंदणी करून घेतली पाहिजे. असे मत व्यक्त केले. त्यामुळे कामगारांची नोंदणी ही वाढू शकते.

श्री कुटास्कर यांनी कामगार नोंदणी नुतणीकरणाचा कालावधी वाढवण्याबाबत स्थानिक पातळीवर अधिकार देण्यात यावे. असे प्रस्तावित केले. याबाबत मंडळाने दिनांक २८.१२.२०१५ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव घेतलेला असून तोही अधिनियमाच्या तरतूदीस धरुन नाही त्यामूळे त्यावरही केंद्र शासनाचे मार्गदर्शन मागविणे आवश्यक आहे, असे मंडळ सचिव यांनी सांगितले.

| | | |
|---|---|---|
| | | याबाबत मा. मंत्री महोदय यांनी सदर दोन्ही प्रकरणी केंद्र शासनाकडून मार्गदर्शन मार्गविण्यात यावे व त्यानुसार राज्य शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे निर्देश दिले.<br><br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br><br>**ठराव: कामगार नोंदणीचा व नुतणीकरणाचा कालावधी वाढविण्याबाबत व नुतनीकरणाचे अधिकार जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांना प्रदान करण्याबाबत केंद्र शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात यावे व त्यानुसार राज्य शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| १६. | **आयत्या वेळचे विषय.** | **विषय क्र.१: मा. कामगार आयुक्त यांना रु. १ लाख मर्यादेपर्यंतच्या बिलाचे अधिकार देणे.**<br><br>याबाबत मंडळ सचिव यांनी मंडळाच्या सर्व प्रकारच्या खर्चाची देयके व धनादेश हे मंडळाचे मा. अध्यक्ष व मा. कामगार आयुक्त यांच्या स्वाक्षरीने अदा व मंजूर करण्यात येतात. परंतु मंडळाचे मा. अध्यक्ष मंडळाच्या महत्वाच्या व कालमर्यादेतील खर्चाच्या |

Desk 30/S/3/2 9

देयकांवर व आयकराच्या धनादेशांवर स्वाक्षरींसाठी आवश्यकतेनुसार उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे आयकराचे धनादेश विहीत मुदतीत आयकर विभागास जमा न झाल्यास त्यावर व्याज व विलंब आकार भरावा लागतो. माहे एप्रिल २०१६ ते डिसेंबर २०१६ या कालावधीत आयकराचे धनादेश विहीत मुदतीत भरणा न झाल्यामुळे आयकराच्या तिमाही विवरणपत्रात मंडळास अतिरिक्त दंड व व्याज भरावे लागले.

त्यामुळे मा. कामगार आयुक्त यांना खर्चाची प्रतिबाबनिहाय रू. १ लाख मर्यादेच्या धनादेशावर त्यांच्या स्वाक्षरीने रक्कम वटविण्याचे अधिकार दिल्यास मंडळाला दंड भरावा लागणार नाही असे सांगितले.

त्यावर मा. अध्यक्ष यांनी सदर विषयाला असहमती दर्शविली. तथापि, आपण आवश्यक तेव्हा स्वाक्षरीस मंडळाच्या कार्यालयात उपस्थित राहू, असे सांगितले.

**विषय क्र.२:मा. अध्यक्ष यांच्या मुंबई येथील वास्तव्यादरम्यानच्या वाहनावरील अतिरिक्त खर्चास मान्यता देणे.**

शासन वित्त विभाग निर्णय क. शासाउ १०.१०/प्र.क्र.९६/१०/६ सा.उ. दि. १३.०३.२०१२ अन्वये राज्य सार्वजनिक उपक्रमाचे अंशकालीन व राज्यमंत्री/मंत्री दर्जा

प्राप्त अध्यक्ष/ उपाध्यक्ष यांना उपक्रमाने/मंडळाने चालकासह वाहन उपलब्ध करून न दिल्यास किंवा अध्यक्षांनी स्वत:चे वाहन कार्यालयीन कामकाजासाठी वापरले नसल्यास शासनाने अनुज्ञेयता दिलेले वाहन निविदा पध्दतीने दर मागवून त्या दराने द.सा. १००००/- कि.मी. च्या प्रवासाच्या मर्यादेत भाडयाने घेता येईल अशी तरतुद आहे. तथापि मंडळाच्या अध्यक्षांनी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात मंडळाच्या बैठका/कार्यालयीन कामकाजाकरीता वाहन सुविधेवरील खर्चापोटी झालेल्या (भाडयाच्या वाहनासाठी) १४३७३ कि.मी. साठी ५,११,५३०/- ची देयके सादर केलेली होती. सदर देयके मंडळाच्या व शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहुन ती वेळोवेळी पारीत करण्यात आलेली आहेत. व त्यांना मंडळाच्या दि. १६.०६.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. व सदर बाबतचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी दि. २३.०९.२०१६ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आलेला आहे. तथापि. सदर प्रस्तावास शासनाची मान्यता प्राप्त झालेली नाही.

मा. अध्यक्षांच्या ०१.०४.२०१६ ते २८.०२.२०१७ या कालावधीच्या भाडयाच्या वाहनासाठी १५६६७ कि.मी. साठी ४,३५,६८७/- एवढया रकमेची देयके सादर केलेली

Desk 30/SFB/C 9

होती व ती मंडळाच्या व शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहुन मंजुर करण्यात आल्याची बाब सचिवांनी मंडळ सदस्याच्या निदर्शनास आणुन दिली.

**सविस्तर चर्चेअंती मा अध्यक्षांच्या ०१.०४.२०१६ ते २८.०२.२०१७ या कालावधीच्या भाडयाच्या वाहनासाठी १५६६७ कि.मी. साठी ४,३५,६८७/- एवढया झालेल्या अतिरीक्त खर्चास मंडळाची मंजूरी देण्याचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

**विषय क्र.३:मंडळाच्या दिनांक ०४.०१.२०१७ रोजीच्या गुंतवणूक बैठकीबाबत.**

मंडळाचे उपस्थित सदस्य श्री. अशोक गोंविदराव भुताड कामगार प्रतिनिधी यांनी मंडळाच्या होणाऱ्या प्रत्येक बैठकीमध्ये मंडळाच्या गुंवणुकीबाबतची माहिती सादर करण्यात यावी असे सुचविले त्यास मंडळाच्या सचिवांनी सहमती दर्शविली.

**विषय क्र.४:परभणी कार्यालयास जानेवारी २०१६ ते डिसेंबर २०१६पर्यतच्या भाडे अदा करण्यास मंजूरी देणेबाबत.**

मंडळाच्या सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले की, मंडळाच्या दि. ०३.०९.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये संमत झालेल्या ठरावानूसार, परभणी जिल्हा

30/503/09

कार्यालयासाठी ७५० चौ. फुट जागा भाडे तत्वावर दि. ०१.०१.२०१६ पासून घेतलेली असून त्यांनी कार्यकारी अभियंता. सार्वजनिक बांधकाम विभाग परभणी यांनी सदरील जागेचे अनुउपलब्धता प्रमाणपत्र व इमारतीचे मुल्यांकन करुन भाडे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. तसेच. सदरील प्रस्तावास मान्यता देवून इमारत मालकास ०१.०१.२०१६ पासून ते ३१.१२.२०१६ पर्यंत भाडे (प्रती महा रु. २६२७X१२ महिने) रु. ६७५२४/- अदा करण्यासाठी आर्थिक तरतूद करण्याबाबत विनंती केलेली आहे.

**सविस्तर चर्चेअंती परभणी कार्यालयास जानेवारी २०१६ ते डिसेंबर २०१६ पर्यंतचे भाडे अदा करण्यास मंजूरी देण्याचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

**विषय क्र.५:महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची माहिती पुस्तिका छापून घेण्याबाबत.**

मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी पुस्तक छपाईस २ वर्षे का लागली? हा मुद्या उपस्थित केला. त्यावर मंडळाच्या सचिव यांनी सदर पुस्तिकेचा प्रारुप वेळेतच तयार करण्यात आले होते. परंतू त्यात वेळोवेळी बदल सुचविण्यात आल्यामुळे पुस्तक छपाईस विलंब झाल्याचे सांगितले.

| | | |
|---|---|---|
| | | याबाबत बोलताना मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की. दिनांक २६.०८.२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत मा. अध्यक्ष यांनी मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांची नोंदणी व सर्व प्रकारचे अर्ज इ. चा समावेश करून १ लाख माहिती पुस्तिका छपाई करावे असे सुचित करण्यात आले आहे.त्यासाठी ई-निविदा प्रक्रियेने कंपनीची नियुक्ती करावी असा ठराव दिनांक ०१.१०.२०१५ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला.ई-निविदेनुसार गाला प्रिंटसिटी लिमिटेड गुजरात यांची निवड करण्यात आली होती. तथापि, सदर पुस्तिकेचा प्रारुप वेळेतच तयार करण्यात आले होते. परंतू त्यात वेळोवेळी बदल सुचविण्यात आल्यामुळे सदर कंपनीकडून माहिती पुस्तक छपाईबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर निविदेमध्ये क्रमांक २ वर असलेली कंपनी मे. प्रिंट प्लस प्रा. लि. मुंबई यांना सदर १,०००००/- मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती पुस्तका छपाईचे काम पूर्ण करून देण्याबाबत विचारणा करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी सदर माहिती पुस्तीका छपाई करून देण्यास तयारी दर्शवली आहे. त्यानुसार त्यांनी छपाई करून दिलेली नमुना पुस्तीका मंडळ बैळकीत सदस्यांना देण्यात आलेल्या आहेत. |

चर्चेअंती महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती पुस्तिका मे. प्रिंट प्लस प्रा. लि. मुंबई यांजकडून छपाई करून घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.६:मंडळांतर्गत शासनामार्फत मान्यताप्राप्त पुर्णवेळ पदांची भरती करणेबाबत.**

याबाबत मंडळाच्या सचिव यांनी असे प्रतिपादन केले की. दिनांक १६.०६.२०१६ च्या बैठकीत मंजूर झालेल्या ५६ पदांव्यतिरिक्त २८७ पदांचा सुधारीत आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनास दि. ०१.०७.२०१६ रोजी पाठविण्यात आलेला आहे. परंतू अद्याप त्यास मान्यता प्रदान करण्यात आली नसल्याचे स्पष्ट केले. त्याचप्रमाणे सेवा प्रवेश नियमास देखील अद्याप शासनाची मान्यता मिळाली नसल्याने पदे भरण्यात आली नाहीत, असे सचिव यांनी नमूद केले.

त्यावर मा. मंत्री महोदय यांनी सद्या मंजूर असलेली ५६ पदे तात्काळ भरण्यात यावीत असे आदेश दिले.

**मंडळांतर्गत शासनामार्फत मान्यताप्राप्त ५६ पुर्णवेळ पदांची भरती तात्काळ**

**करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

**विषय क्र.७:मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांसाठी भाडेतत्वावर घरकूल योजना समितीवर आर्किटेक्टची (Architect) नियुक्ती करणेबाबत.**

मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांसाठी भाडेतत्वावर घरकूल योजना समितीवर आर्किटेक्टची (Architect) नियुक्ती करणेबाबत मंडळाचे सचिवांनी खालीलप्रमाणे प्रतिपादन केले की.

दि.२३.०६.२०१६ रोजी मंडळाच्या बैठकीत मा. मुख्यमंत्री यांनी मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी प्रायोगिक तत्वावर सुरूवातीस विभागीय स्तरावर भाडेतत्वावर घरकूल योजना राबविण्यात यावी. असे निर्देश दिले आहेत.

त्यासाठी संबंधित महानगरपालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सिडको इ. यांचेकडून जागा उपलब्ध करुन घ्यावी व शासनाच्या सर्व संबंधित सहमतीने घरकूल योजना प्रायोगिक तत्वावर राबविण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला आहे.

त्यानुसार दि. ११.०८.२०१६ व दि. ११.११.२०१६ रोजी शासनास प्रस्ताव सादर

करण्यात आला होता. त्यासअनुसरून शासनाचे पत्र दि. २०.०२.२०१७ अन्वये मंडळातील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांकरीता भाडयाच्या घरांचा संचय निर्माण करण्याच्या योजनेस शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

त्यानुसार सदर योजना राबविण्यासाठी उक्त उपसमितीमार्फत योजनेचा आराखडा बनविणे आवश्यक आहे. त्यामध्ये योजनेचे निकष जसे की, जागा विकत घेऊन त्यावर घरे बांधून घ्यावेत अथवा विकासकांकडून तयार घरे विकत घ्यावीत. अथवा तयार घरे भाडे तत्वावर घ्यावीत याबाबतची व्यवहार्यता तपासणे. कामाच्या ठिकाणापासून घरांचे अंतर, भाडयाचे निकष म्हणजेच घराच्या क्षेत्रफळाच्या प्रमाणात भाडयाची शहर निहाय/स्थळनिहाय दरनिश्चीती, पात्र बांधकाम कामगारांकडून करण्यात येणारी भाडयांच्या घरांची मागणी, मागणीच्या प्रमाणात घरांची उपलब्धता/पुरवठा याबाबत नियतकालिक तपासणी करणे, घर

वितरणाचे निकष, घरांची दुरस्ती व देखभाल, विद्युत/पाणी पुरवठा तसेच मालमत्ता कर भरणे इ. सर्व बाबींचा अंतर्भाव करून योजनेचा सर्व समावेशक आराखडा उपसमितीमार्फत तयार करून घेऊन मंडळाच्या मान्यतेनंतर शासनास सादर

**मानधन) निवीदा सादर केलेली आहे. त्यांची सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी समितीवर आर्किटेक्टची (Architect) म्हणून नियुक्ती करणेबाबतचा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आलेला आहे.**

**विषय क्र.८: कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरविणाऱ्या मे. ब्रिस्क इंडिया प्रा. लि.यांचे कंत्राटास १ वर्षाची मुदतवाढ देण्याबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाचे मुख्यालय, विभागीय कार्यालय, व जिल्हा कार्यालय येथे बाहय यंत्रणेद्वारे कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी मे. ब्रिस्क ईंडिया प्रा. लि. पुणे शासन मान्यतेनुसार ३ वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली होती. सदर पदे अद्याप मंडळाच्या सर्व कार्यालयात कार्यरत आहेत.

शासन निर्णयानुसार मंडळावरील बाहय यंत्रणेद्वारे कर्मचाऱ्यांची भरती करणाऱ्या मे. ब्रिस्क ईंडिया प्रा. लि. यांचा ३ वर्षाचा कालावधी दिनांक १७.०६.२०१७ रोजी संपुष्टात येत आहे. सदर सेवा पुढे कार्यरत ठेवण्यात यावी किंवा कसे? याबाबत शासनाकडे मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे.

याबाबत मा. मंत्री महोदय यांनी सदर कंपनीस मुदतवाढ देण्याविषयी लवकरच

Doc 80/Page 9

शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल. असे नमूद केले.

**विषय क्र.९: मंडळाच्या लेख्यांचे लेखांकन (Data Entry) माहे एप्रिल २०१७ पासून Tally Solution या लेख्याच्या संगणकीय पदध्तीने सुरू करणे.**

मंडळाचे सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या लेख्यांचे लेखांकन (Data Entry) माहे एप्रिल २०१७ पासून Tally Solution या लेख्याच्या संगणकीय पदध्तीने सुरू केल्यास मंडळाच्या लेख्याचे काम जलद गतीने, परिणामकारक व अचूक पध्दतीने विहीत मुदतीत पुर्ण करणे शक्य होईल व त्यासाठी सदर Tally Solution प्रणाली विकसित करण्यासाठी दर पत्रके मागवून तज्ञ कंपनीकडून सदर संगणकीय पध्दती विकसित करून घेणे आवश्यक आहे.

मंडळाच्या लेख्यांचे लेखांकन (Data Entry) माहे एप्रिल २०१७ पासून Tally Solution या लेख्याच्या संगणकीय पदध्तीने सुरू करण्यासाठी तज्ञ कंपनीकडून दर पत्रके मागवून कमी दर असलेल्या कंपनीकडून सदर संगणकीय पध्दती विकसित करून घेण्यात यावी असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

**विषय क्र. १०:मंडळाचे कार्यालय अंधेरी येथे स्थलांतरीत करणे.**

मंडळाचे सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, कामगार कल्याण मंडळाच्या एल्फिस्टन रोड, परेल या इमारतीमधील एक मजला अथवा अंधेरी (पूर्व) येथील त्यांची इमारत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या स्वतंत्र कार्यालयासाठी उपलब्ध करून देता येईल असा ठराव मंडळाच्या दिनांक २३.०६.२०१६ रोजी मा. मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत घेण्यात आला. तथापि, परेल येथील इमारतीमध्ये मंडळाच्या कार्यालयासाठी आवश्यक तेवढी जागा उपलब्ध होत नसल्याचे नमूद केले.

यावर मा. कामगार आयुक्त यांनी कामगार कल्याण मंडळाची अंधेरी येथे प्रशस्त इमारत संपूर्णपणे रिकामी असून येथील जागा मंडळाच्या कार्यालयासाठी घेणे सोईस्कर होईल असे नमूद केले.

याबाबत मा. अध्यक्ष यांनी मंडळाचे कार्यालय अंधेरी येथे अधिवेशानानंतर स्थलांतरीत करण्यास सहमती दर्शविली.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**मंडळाचे स्वतंत्र कार्यालय कामगार कल्याण मंडळ अंधेरी येथील इमारतीत अधिवेशनानंतर स्थलांतरीत करण्यात यावे असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.**

**विषय क्र. ११: मंडळाचे मा. अध्यक्ष यांच्या वाहन खरेदीबाबत.**

मंडळाचे सचिव यांनी असे प्रातिपादन केले की, मंडळाचे मा. अध्यक्ष यांना राज्यमंत्री पदाचा दर्जा प्राप्त झाल्यानुसार २० लाखाच्या मर्यादेपर्यंत शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे. परंतु, मा. अध्यक्ष यांना २० लाखापेक्षा जास्त किंमत असलेले इनोव्हा क्रिस्टा कंपनीचे वाहन खरेदी करण्याचा मानस आहे. यावर मा. मंत्री महोदय यांनी अध्यक्ष यांना अपेक्षित असलेले वाहन खरेदी करण्यास शासन म्हणून मान्यता देण्यात येत असल्याचे नमूद केले. तथापि, त्यावर मालक प्रतिनधी श्री. मगर यांनी स्वत: पुढाकार घेऊन सदरचे वाहन रु. २० लाख किमतीच्या आत मंडळाच्या अध्यक्षांना उपलब्ध करुन देण्याचे आश्वासित केले व त्यानुसार वाहन खरेदी करण्याचे सर्वानुमते ठरले.

सर्व विषयांवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.

********************

मा. अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ,
मुंबई

मा. मंत्री
कौशल्य विकास व उद्योजकता
कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण,
मंत्रालय, मुंबई